**आजचा शुभ विचार**

“"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा
स्वत:च्या ताकदीवर विश्वास
ठेवा."आपण जे करतोय किंवा
आपल्यात जी ताकद आहे ती
ओळखायला शिका.
नशिबावर निर्भर राहू नका."
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-47 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 20 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ४७ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. २१ जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## बोलबच्चन भैरवी असलेल्यांना उत्तर देत नाही... देवेंद्र फडणवीस यांची उद्धव ठाकरे यांच्यावर टीका

संदीप पाटील
जळगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



शिवसेनाप्रमुखांचा ब्रँड पुसून टाकण्याचा प्रयत्न केल्यास भाजपचे नामोनिशाण महाराष्ट्रातून मिटवून टाकू, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी गुरूवारी मुंबईत पार पडलेल्या पक्षाच्या मेळाव्यात दिला होता. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही बोलबच्चन भैरवींना मी उत्तर देत नाही, अशी टीका ठाकरे यांचे नाव न घेता केली.

कम ऑन किल मी... हिंमत असेल तर अंगावर या...पण अंगावर येणार असाल तर एक गोष्ट नक्की करा, अमिताभच्या चित्रपटात तो ॲम्बुलन्स घेऊन येतो तशी ॲम्बुलन्स घेऊनच या. कारण तुम्ही पायावर चालत जाणार नाही, तर जाताना आडवे होऊन स्ट्रेचरवर जाल, असा आसूड उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील मेळाव्यात ओढला होता. ठाकरे यांच्या या टिकेला उत्तर देताना शुक्रवारी जळगाव येथे देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना बोलबच्चन भैरवी अशी उपाधी दिली. अशांना मी उत्तर देत नाही, असा टोलाही त्यांनी हाणला.

क्रांतिवीर ख्वाजा नाईक यांच्या स्मारकाचे लोकार्पण आणि ग्रामीण रुग्णालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी धरणगाव येथे केले. तत्पूर्वी, जळगाव विमानतळावर आगमन झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात आदिवासी समाजाचे मोठे योगदान राहिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व आदिवासी स्वातंत्र्य सेनानींचा गौरव झाला पाहिजे, यासाठी वेगवेगळे कार्यक्रम काही वर्षांपासून हाती घेतले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून क्रांतिकारी नाईक यांच्या स्मारकाच्या भूमिपूजनासाठी यापूर्वी धरणगावात आलो होतो. आता स्मारकाच्या उद्घाटनाची संधीही मिळाली, असे फडणवीस यांनी नमूद केले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आघाडीचा लवकरच निर्णय, राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची माहिती

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवण्याबाबत चर्चा करतील आणि लवकरच निर्णय जाहीर होईल.' असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्ट केले. बारामती येथे प्रसार माध्यमांशी बोलताना पवार म्हणाले,' सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तीन महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्या लागतील. यासंदर्भात महाविकास आघाडीतील पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवण्याबाबत चर्चा करतील. लवकरच निर्णय जाहीर होईल.' 'उद्धव ठाकरेंची मुंबईत मोठी ताकत आहे. त्यांना विश्वासात घेऊन निवडणुकीला सामोरे जावे लागेल.' असेही शरद पवार म्हणाले.

पहिलीपासून हिंदी भाषेच्या सक्तीबाबत शरद पवार म्हणाले,' हिंदीची सक्ती नको; पण विरोधही नको. देशातील ६० टक्के लोक हिंदी बोलतात, त्यामुळे सक्तीची गरज नाही.' माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार म्हणाले,' 'लोकसभा निवडणुकीवेळी रात्री बारा वाजता बँक उघडून सेवा दिली गेली. आता पुन्हा तशीच परिस्थिती आहे. ज्यांच्या हातात कारभार आहे, ते ठरवतील.' असे सांगत शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव न घेता टीका केली.

## शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात १०० कोटींचा घोटाळा

दिपक रोकडे
छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी राज्य शासनाने अनुदान वाटप प्रक्रिया सुरू केली. या अनुदानाच्या वाटपात १०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला. भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी हा घोटाळा उघड केला. अनुदान वाटप घोटाळा प्रकरणी दोषी आढळलेल्या २१ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले. घोटाळा प्रकरणी SIT अथवा C B I मार्फत सखोल तपास करण्याची मागणी आमदार लोणीकर यांनी केली आहे. जालना जिल्ह्यात अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे शेतकरी संकटात सापडले होते. शासनाने शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ४१२ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले होते. या अनुदानाचे वाटप करतेवेळी १०० कोटी रुपयांचा घोटाळा उघड झाला. काही अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्रे दाखवून अनुदान लाटले. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार ३४.९७ कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. पण भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे. अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफराबाद तालुक्यांमध्ये हा घोटाळा झाला. यात तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांचा समावेश आहे, असा आरोप भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी केला. जालना येथे जिल्हा नियोजन समितीची १४ जून २०२५ रोजी बैठक झाली. या बैठकीत पहिल्यांदाच भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी घोटाळा झाल्याचा आरोप केला. घोटाळा प्रकरणी कारवाई झालेल्या २१ अधिकाऱ्यांमध्ये १० तलाठी आणि ११ इतर अधिकारी आहेत. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी तीन सदस्यांची समिती नेमली आहे. या समितीने अंबड आणि घनसावंगीतील ८० गावांची फेरतपासणी केली. यात ७४ कर्मचारी दोषी आढळले आहेत. आणखी १५ जणांवर निलंबनाची टांगती तलवार आहे. काम करत असलेल्या पाच तहसीलदार आणि पाच नायब तहसीलदारांना नोटीस पाठवण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने आतापर्यंत पाच कोटी ७४ लाख रुपये वसूल केले आहेत. इतर वसुलीसाठी अधिकाऱ्यांची संपत्ती जप्त करण्याची मागणी आमदार लोणीकर यांनी केली आहे. एकूण दोन लाख ५७ हजार २९७ शेतकऱ्यांपैकी एक लाख ९४ हजार ११३ जणांना अनुदान मिळाले आहे. तर ६३ हजार १८४ शेतकऱ्यांचे अनुदान आणि १५ हजार ३१ जणांचे ई-केवायसी (e-KYC) प्रलंबित आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये गेल्या पाच वर्षांतील अनुदान वाटपाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे इतर जिल्ह्यांतील गैरप्रकार उघड होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे
राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदुत गौरव पुरस्कार
कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE
दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

**प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना**

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

## नाशिक-पंढरपूर सायकल वारी प्रारंभ; दोनशेपेक्षा अधिक जणांचा सहभाग

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या वतीने शुक्रवारी सकाळी नाशिक ते पंढरपूर या ३६० किलोमीटरच्या पर्यावरण संवर्धन सायकल वारीस प्रारंभ झाला. पर्यावरणपूरक वारीत यावेळी सायबर फसवणुकीविषयी प्रबोधन करण्यात येणार आहे. वारीत २०० हून अधिक सायकलपटू सहभागी झाले आहेत.नाशिक सायकलिस्टव्दारे दरवर्षी वेगवेगळे सामाजिक उपक्रम वारीदरम्यान राबविण्यात येत असतात. यावर्षी सायबर फसवणूक या विषयावर वारीत प्रबोधन करण्यात येणार आहे.

शुक्रवारी सकाळी सायकल वारी हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानापासून निघाली. रामकृष्ण हरी, पांडुरंग हरी असा गजर करीत फेरीला सुरूवात झाली. प्रारंभी फेरीचा मार्ग कसा असेल , सायकलपटूंनी कोणती काळजी घ्यावी, याविषयी माहिती देण्यात आली. वारीत महिलांचाही समावेश असून १६ ते ७५ वयोगटातील सायकलपटू सहभागी झाले आहेत. वारीबरोबर वैद्यकीय, सायकल दुरूस्ती पथक तसेच स्वयंसेवकाचा चमु आहे. सायकल वारी तीन दिवसात पंढरपूर गाठणार आहे. तिसऱ्या दिवशी राज्यातील ९० सायकल क्लब पंढरपूर येथे नगर प्रदक्षिणा करणार आहेत. यानंतर परतीच्या प्रवासाला सुरूवात होईल.वारीदरम्यान " डिजिटल सापळा" हे पथनाट्य ठिकठिकाणी सादर करण्यात येणार आहे.सेवानिवृत्त पोलीस अधिकारी हरीश बैजल यांचे पथनाट्यासाठी मार्गदर्शन लाभले आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# ही युद्धखोरी कुठे नेणार?

काही कट्टरवादी देश युद्धप्रसंगी काय निर्णय घेतील, याची हमी कोणताच देश देऊ शकत नाही. त्यातील एक असलेल्या इराणमध्ये अण्वस्त्रे तयार करण्याची क्षमता आहे आणि अस्तित्वाचा सामना करावा लागला, तर हा देश अण्वस्त्रांची निर्मिती करून इस्रायलसारख्या देशांच्या अस्तित्वाला धक्का देऊ शकतो, अशी भीती अमेरिका, पाश्चिमात्य देश आणि इस्रायलला आहे. त्यानिमित्ताने पश्चिम आशियामध्ये माजलेल्या युद्धखोरीचा हा वेध.

१० जून रोजी सीबीएस न्यूजने सूत्रांच्या हवाल्याने अमेरिकन अधिकाऱ्यांना सांगितले होते की, इस्रायल इराणमध्ये लष्करी कारवाई करण्याची पूर्वतयारी करत आहे. अमेरिकेला भीती होती की इस्रायलने इराणवर हल्ला केल्यास इराण शेजारी इराकमधील काही अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले करून प्रत्युत्तर देऊ शकतो. १२ जूनच्या रात्रीपासून इस्रायलने इराणवर प्रथम क्षेपणास्त्रांचा वर्षाव, त्यापाठोपाठ विमाने आणि ड्रोणद्वारे हल्ले सुरू केले. इस्रायलने केलेल्या या भीषण हल्ल्यात इराकचे सैन्य, हवाई संरक्षण प्रणाली आणि आण्विक कार्यक्रमाच्या दृष्टीने अतोनात नुकसान झाले. इराण लष्कराचे मुख्य अधिकारी प्रमुख हुसेन सलामी आणि मेजर जनरल बघेरी यांच्याबरोबर कैक कमांडर तसेच सहा शास्त्रज्ञदेखील मरण पावले. प्रत्युत्तरादाखल इराणनेदेखील इस्रायलवर क्षेपणास्त्रांद्वारे हल्ले केले. त्यांनी इस्रायलच्या तेल अविवसह इतर प्रमुख शहरांचे नुकसान झाले. पाश्चात्त्य गुप्तचर संस्थांनी २००२ मध्ये इराणचा गुप्त आण्विक कार्यक्रम उघड केला होता. त्यानंतर बरीच वर्षे इराणी अधिकारी उघडपणे अण्वस्त्रे तयार करण्याची धमकी देत होते. मध्यंतरी हेलिकॉप्टर अपघातात इराणचे अध्यक्ष आणि परराष्ट्र मंत्री ठार झाले, तेव्हाही त्या घटनेत इस्रायलचा हात असल्याचे आढळल्यास गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल, अशी धमकी इराणने दिली होती. त्यावेळीदेखील इराण अण्वस्त्र संपन्न असल्याची शंका जगाला आली होती. डिसेंबर २०२४ मध्ये इराणचे माजी परराष्ट्रमंत्री कमल खराझी यांनी इस्रायलला सरळ सरळ आण्विक हल्ल्याची धमकी दिली. तेव्हापासूनच अस्वस्थ असणाऱ्या इस्रायलकडून इराणवर मोठा हल्ला होणार हे निश्चित होते, तसा तो झाला आणि जगभरात गदारोळ माजला.

इराणकडे आधीच अण्वस्त्रे आहेत आणि त्यांनी अद्याप त्यांची चाचणी केलेली नाही, असा दावा इराणी संसदेच्या परराष्ट्र धोरण समितीच्या माजी सदस्याने १० मे रोजी केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना इराण आण्विक हत्यार बनवण्याच्या अगदी जवळ पोहोचला असल्याचे सांगितले. त्यामुळे या देशावर कठोर निर्बंध लादणे गरजेचे आहे, असे विधान करत त्यांनी इराणच्या तेल निर्यातीला लक्ष्य करण्याचा आदेश दिला. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्रायलची ढाल बनून उभ्या असलेल्या अमेरिकेलाही युद्धाच्या आगीत जाळण्याची धमकी दिली. या धमकीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने अरबी समुद्रात लष्कराची तैनाती वाढवली. इस्रायलची सुरक्षितता हे अमेरिकेला चिंता वाटण्याचे कारण नव्हे, तर इराणच्या अण्वस्त्र संपन्नतेबाबतही अमेरिका साशंक आहे. म्हणून अमेरिकेने इस्रायलच्या आडून इराणवर हल्ले केले, असे म्हणायला जागा आहे. इस्रायलस इराणच्या अणुबॉम्बनिर्मितीच्या प्रयत्नांची आणि ते लपवून ठेवल्याची शंका आहे. आपल्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्यास इराण शत्रू राष्ट्रावर अण्वस्त्र हल्ला करण्यास कदापी कचरणार नाही. कट्टरवादाची पार्श्वभूमी असलेले काही देश युद्धप्रसंगी काय निर्णय घेतील याची कोणताच देश हमी देऊ शकत नाही. या व्यतिरिक्तही अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांना इराणबाबत भीती वाटते.

अण्वस्त्रे बनवण्याचे तंत्रज्ञान इराणने पाकिस्तानकडून मिळवले असण्याची शंका आहे. आपल्या देशात अतिरेकी संघटनांना थारा देणाऱ्या पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे कितपत सुरक्षित आहेत, याबद्दलही साशंकता आहे. तीच परिस्थिती इराणच्या बाबतीतही आहे. सीरिया, येमेन, पॅलेस्टिन आणि लेबॅनॉनमध्ये असलेल्या इस्रायलविरोधी हमास आणि हिजबुल्लाह यांच्या हाती ही अण्वस्त्रे पडल्यास अवघ्या जगात हाहाकार उडेल, ही भीती व्यक्त करताना इस्रायलने इस्फहान अणु तंत्रज्ञान केंद्राजवळ हल्ला केला होता. यामध्ये अणु संशोधन अणुभट्टी, युरेनियम रूपांतरण प्रकल्प आणि इंधन उत्पादन प्रकल्प आहे. पण त्यावेळी या हल्ल्यात इराणच्या अण्वस्त्र केंद्रांना इस्रायलने थेट लक्ष्य केले नसले तरी, इराणच्या नेतृत्वाने आपल्या आण्विक धोरणावर पुनर्विचार करण्यासाठी धमकी म्हणून हे हल्ले केल्याचे इस्रायलने स्पष्ट केले. मात्र तरीही इराणने आपला आण्विक कार्यक्रम पुढे चालू ठेवल्याने १२ जून रोजी इस्रायलने इराणच्या आण्विक ऊर्जा प्रकल्पावर हल्ले केले.

गेल्या काही दिवसांपासून इस्राएल आणि इराणमधील तणाव त्यांच्या पारंपरिक प्रॉक्सी स्वभावापासून दूर गेला आणि एकमेकांच्या प्रदेशांवर थेट हल्ल्यांच्या रूपात प्रकट झाला. इराणच्या आण्विक समस्येवर वेळेवर आणि गैरलष्करी तोडगा काढण्याची गरज वाढली म्हणूनच ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी आल्यावर इराणवर व्यावसायिक निर्बंध लादायला सुरुवात केली. पण आजवरचा इतिहास पाहता इराण त्याकडे कितपत गांभीर्याने पाहील याबाबत इस्रायल साशंक होता. त्यातूनच या देशाने मोसाद या आपल्या गुप्तचर यंत्रणेद्वारे इराणच्या आण्विक कार्यक्रमाची गुप्त माहिती काढली आणि कथित धोका लक्षात येताच हे हल्ल्याचे पाऊल उचलले, असे म्हणायला जागा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इराणने हमास आणि हिजबुल्लासारख्या इस्रायलविरोधी दहशतवादी संघटनांना पाठिंबा म्हणून शस्त्रास्त्रे खरेदीसाठी खूप पैसा खर्च केला. त्यामुळे त्यांना इस्रायलशी दोन हात करायला मदत झाली. इराण या दहशतवादी संघटनांना मदत म्हणून लष्करी तळ, शस्त्रास्त्रांचे डेपो आणि क्षेपणास्त्र कारखाने चालवतो.

इस्रायलच्या मते इराण गुप्तपणे अण्वस्त्रनिर्मिती करण्याच्या मार्गावर असून त्याची युरेनियम समृद्धीकरणाच्या क्रियाकलापांची व्याप्ती अज्ञात आहे. अशा परिस्थितीत इराणने अण्वस्त्रनिर्मिती केल्यास ती दहशतवादी संघटनांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. अशी अण्वस्त्रे दहशतवाद्यांकडून कोणाही देशाविरुद्ध वापरली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच इस्राएल इराणविरुद्ध करत असलेल्या कारवाईला अमेरिकेसाठी पाश्चात्त्य देशांचा ठाम पाठिंबा असेल. यातून अगदी जागतिक युद्धाला सुरुवात होण्याची शक्यता नसली तरी हिजबुल्लाह दहशतवादी संघटनेमुळे लेबॅनॉनसारखा एखादा देश यात ओढला जाण्याची शक्यता आहे. एका वेळी पाच-सहा राष्ट्रांशी दोन हात करणाऱ्या इस्रायलला त्याने फारसा फरक पडत नसला तरी यावेळी इस्रायलने इराणवर केलेले हल्ले पाहता कोणाचाही विरोध न जुमानता आरपारची लढाई करण्याचा इरादा केल्याचे स्पष्ट जाणवत आहे. इस्रायलने इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचे अतोनात नुकसान केल्यावर इराणचे संरक्षणमंत्री मोहम्मद बघेरी यांनी इस्रायलने इराणवरील हल्ले ताबडतोब न थांबवल्यास पाकिस्तान इस्रायलविरुद्ध अण्वस्त्रांचा वापर करेल, असे विधान करून खळबळ उडवून दिली. तेव्हा इराणनंतर पाकिस्तानची अण्वस्त्रे इस्रायल आणि अमेरिकेकडून नष्ट केली जातील, अशी अटकळ बांधली जाऊ लागली. त्यानंतर युद्धाच्या पाचव्या दिवशी इराण-इस्रायलमधील संघर्ष विकोपाला जाऊन, इस्राइलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी इराणी जनतेने राजधानी तेहरान हे शहर सोडून जावे असे फरमान काढले. एकीकडे इराणचे राष्ट्रपती खामेनी यांना मारल्याशिवाय हे युद्ध थांबणार नाही अशी घोषणा इस्रायलकडून केली जात होती, तर खामेनी कुठे आहेत याची माहिती आमच्याकडे असून आत्ता त्यांना टार्गेट करायचा कोणताही इरादा नसल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले.

अमेरिकेने या हल्ल्यात आपली कोणतीही भूमिका नव्हती हे स्पष्ट केले आहे. ११ जूनला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रे बनवू देणार नाही असे वक्तव्य केले होते. १६ जून रोजी कॅनडातील अल्बर्टा येथील कनानास्किस येथील जी-७ शिखर परिषदेत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भाग घेतला होता. त्या परिषदेत सर्व देशांनी एकमताने इस्रायलची कारवाई योग्य असल्याचा ठराव मंजूर करत पूर्ण पाठिंबा दिला. त्याच दिवशी डोनाल्ड ट्रम्प संमेलन सोडून अमेरिकेला परतले. तेव्हाच ते काहीतरी मोठी घोषणा करणार हे निश्चित झाले. इराणच्या हवाईक्षेत्रावर पूर्णपणे आमचे वर्चस्व प्रस्थापित झाले असून इराणने त्वरित युद्धातून बिनशर्त माघार घ्यावी अन्यथा परिणाम वाईट होतील, अशी धमकीही दिली. या घोषणेद्वारे चालू युद्धात आपलाही सहभाग असल्याचे आणि इराणवर अमेरिकेकडूनही हल्ले होणार याचे सरळ संकेत मिळाले. हिंद सागरात अमेरिकेने आपल्या विमानवाहू नौका हलवल्यावर या संकेतांना दुजोरा मिळाला. अशा परिस्थितीत पाश्चिमात्य देश आणि काही मुस्लीम राष्ट्रे युद्धात उतरतील आणि तिसऱ्या जागतिक युद्धाला सुरुवात होईल असा अंदाज काही संरक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. एक युद्ध एखादा विकसित किंवा विकसनशील देशाला १५-२० वर्षे मागे घेऊन जाते आणि अशा युद्धात जाणारे निष्पाप जनतेचे बळी आणि होणारे हाल तर कैक वर्षांचा आघात करून जातात.

# २१ जूनः जागतिक योग दिन विशेष
# योगाभ्यासाचा माझा भारतदेश विश्वगुरू!

दररोज योगा केल्याने आपल्या शरीरावर सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन इष्ट परिणाम होतो. शरीर आणि मन शांत करण्यासाठी योगा खुप फायदेशीर मानला जातो. योग केल्याने आपल्या शरीराला ऊर्जा मिळते, स्नायूंची ताकद वाढते. तसेच यामुळे आपले श्वसन, ऊर्जा आणि चैतन्य सुधारते. तो सर्वांना वर्तमानात जगायला शिकवतो. योगासनांमुळे स्नायूंना बळ मिळते. नियमित योगासने केल्याने शरीरातील अतिरिक्त चरबीही कमी होते. तणाव दूर होऊन चांगली झोप लागते; आपली पचनक्रियाही सुधारते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा माहितीपूर्ण लेख...

शरीर आणि मन निरोगी ठेवणाऱ्या जागतिक योग दिनाचा इतिहास आणि महत्त्व जाणून घेणे आवश्यक आहे. इंटरनॅशनल योगा डे- आंतरराष्ट्रीय योग दिन हा दरवर्षी २१ जून रोजी जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी या दिनाला मान्यता दिली आहे. भारताचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी दि.२७ सप्टेंबर २०१४मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला होता; दि.११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने जाहीर केले की, २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात यावा. त्यानुसार हा दिवस साजरा केला जातो. दि.२१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. या दिवशी संपूर्ण जगभरात अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भारताची राजधानी दिल्ली येथे राजपथावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः कार्यक्रमात सहभाग घेऊन योगासने केली.

योगाचे प्रमाणित ग्रंथ जसे- शिवसंहिता व गोरक्षशतक यांमध्ये चार प्रकारचे योग सांगितले आहेत- १) मंत्रयोगः यात वाचिक, मानसिक, उपांशू व अणपा २) हटयोग ३) लययोग ४) राजयोगः यात ज्ञानयोग व कर्मयोग येतात. पतंजलीप्रमाणे योगाची आठ सूत्रे- १. यम- खरे बोलणे, अहिंसा, लोभ न करणे, विषयासक्ती न धरणे आणि स्वार्थी न होणे. २. नियम- पवित्रता, समाधानी, तपश्चर्या, अभ्यास व ईश्वर चरणी जाणे ही होत. ३. आसन- बसण्या-उठण्याच्या पद्धती. ४. प्राणायाम- श्वास घेणे, श्वास सोडणे आणि श्वास रोखून धरणे महत्त्वाचे. ५. प्रत्याहार- बाह्य वस्तू, इंद्रियांपासून प्रत्याहार. ६. धारणा- एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे. ७. ध्यान- याबाबत प्रकृतीचे चिंतन करणे. ८. समाधी- ध्यान करणाऱ्या वस्तूंचे चैतन्यासह विलिनीकरण करणे समाविष्ट आहे. याचे सविकल्प व अविकल्प हे दोन प्रकार आहेत. अविकल्पात जगाकडे परतण्याचा मार्ग नसल्यामुळे ही योगपद्धतीची चरमस्थिती मानतात. तर श्रीमद भगवद्गीतेतील योग तीन प्रकारचे- कर्मयोग- व्यक्ती आपल्या स्थितीच्या योग्य कर्तव्यानुसार श्रद्धेप्रमाणे कार्य करतात. भक्तियोग- यात भगवद कीर्तन मुख्य आहे. भावनात्मक व्यवहारी लोकांना हे सुचवले जाते. ज्ञानयोग- यात ज्ञानप्राप्ती करून ज्ञानी होणे अभिप्रेत आहे.

योगाभ्यास आणि त्याचे फायदे याबाबत जनजागृती करण्यासाठी संपूर्ण जगभरात दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. मानवी जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योग भ्यासामुळे मानवी जीवनात शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पातळीवर अनेक सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते. २१ जून हा वर्षातील इतर दिवसांपेक्षा सर्वात मोठा दिवस असतो. या दिवशी उत्तरायण संपून दक्षिणायण सुरू होते. या दिवशी सूर्योदय लवकर होऊन सूर्यास्त उशीरा होतो. दिवस मोठा असल्याने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. योग ही भारताची प्राचीन परंपरा आहे. ज्ञान प्राप्त करण्यासाठी आणि शरीर व मन तंदुरुस्त राखण्यासाठी विशिष्ट योगसाधना केल्या जातात. प्राचीन काळापासून आजतागायत या सर्व साधना गुरु-शिष्य परंपरेने जतन केल्या गेल्या. परंतु तरीही लोकांच्या मनात योगाविषयी हवी तेवढी जागरुकता नव्हती. त्याचे महत्त्व काही मर्यादित लोकांनाच माहित होते व लोकांच्या मनात त्यांविषयी काही गैरसमजही होते. उदा- योग अंगीकारणे म्हणजे संसारापासून दूर जाणे किंवा योग हा फक्त हिंदूधर्माचा भाग आहे, इत्यादी. तसेच काही लोकांनी त्यातील साधनांमध्ये अन्य विचित्र गोष्टींचे मिश्रण करून त्यांचे स्वरूप विकृत करून टाकले होते; उदा.बियर योग, डॉग योग आदी. योगाच्या प्राचीन शास्त्रशुद्ध परंपरेतील साधनांविषयी लोकांच्या मनातील गैरसमज दूर करून जागरूकता उत्पन्न व्हावी आणि अधिकाधिक लोकांनी योगाभ्यास करून आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले करावे, हा जागतिक योग दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश आहे.

जागतिक योग दिनामुळे समाजाच्या सर्व स्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती होण्यास मदत झाली आहे.

जागतिक योग दिनानिमित्त शासकीय तसेच इतर स्तरावरूनही योगाशी संबंधित अनेक कार्यक्रमांचे मोठ्या उत्साहाने आयोजन केले जाते. त्यामध्ये योगासने, शुद्धिक्रिया, प्राणायाम अशा अनेक योगसंबंधित क्रियांचे प्रात्यक्षिक दाखवले जाते आणि योग-तत्त्वज्ञान, योगाचे प्राचीन ग्रंथ, योगातील साधना, योगचिकित्सा आदी अनेक विषयांची माहिती देणारी व्याख्याने आयोजित केली जातात. शालेय स्तरावरून विद्यार्थ्यांसाठी सामूहिक स्वरूपात सूर्यनमस्कार, योगासने आदी कार्यक्रम आयोजित केले जातात. म्हणून सद्यस्थितीत योगसाधनेला आपल्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग बनवणे गरजेचे झाले आहे. सन २०२०मध्ये आलेल्या कोविड साथीमुळे शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्य देखील अधिक धोक्यात आले. अशा काळात असंख्य लोक महाजाल-इंटरनेटच्या माध्यमातून एकत्र येऊन योगसाधना करताना दिसत आहेत. सन २०२० व २०२१मध्ये ज्याठिकाणी कोविड साथीमुळे लोकांना एकत्र येऊन योगसाधना करणे शक्य नव्हते, तेथे महाजालकाच्या माध्यमातून एकत्र येऊन मोठ्या उत्साहात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला होता.

!! विश्व योगा दिनाच्या समस्त मानवास संपूर्ण सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व शब्दांकन -

श्री कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली

# मुखेडच्या दुय्यम निबंधक कार्यालयात सुविधांचा अभाव

## महसुली उलाढालीतून उत्पन्न भरघोस; नागरिक मात्र मूलभूत सुविधांपासून वंचित

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत




मुखेड तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात दररोज लाखो रुपयांची नोंदणीची उलाढाल होत असूनही, कार्यालयात नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागातून अनेक नागरिक जमीन खरेदी-विक्री किंवा अन्य नोंदणीसाठी या कार्यालयात येत असतात. विशेषतः मुखेड तालुका डोंगराळ आणि शेतीप्रधान असल्याने येथील नोंदणी व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत असतात. मात्र, कार्यालयात ना शौचालयाची सुविधा आहे, ना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. स्वच्छतागृह तसेच हिरकणी कक्ष नसल्यामुळे महिलांना विशेषतः असुविधाजनक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. विशेष बाब म्हणजे परिणामी वृद्ध, महिला आणि लहान मुलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

महिलांसाठी अडचणी वाढवणारी स्थिती

या कार्यालयात या कार्यालयाच्या प्रमुखदेखील महिला आहेत, तरीही महिला हितग्राहकांसाठी आवश्यक त्या सोयी उपलब्ध झालेल्या नाहीत.

तक्रारी असूनही कोणतीही ठोस कारवाई नाही

सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी तोंडी तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. यामुळे स्थानिक नागरिकांत असंतोष निर्माण झाला असून, तात्काळ आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिवस

## आरोग्यासाठी योगा,पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज

संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २१जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता.त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले.योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे याचे मी स्वागत करतो.योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असुन शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन,मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असुन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे.त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती.आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे.अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळे पणाने बागडण्या करीता जागा किंवा ग्राउंड अपुरे पडताना दिसतात.कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.अशा परीस्थितीत लहान-मोठी,आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडु शकत नाही.परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा,व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात.पुर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या.अशा परीस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होतांना दिसतात.परंतू शारिर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे.योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो.आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे.यात अनेक मुस्लिम राष्ट्र सुध्दा आहेत.हा भारताचा मोठा मान आहे.कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवु शकतो.आजच्या परिस्थितीत मुल पुढील भविष्याच्या वाटचालीकरीता अभ्यात मग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या आदीन झाल्याचे दिसून येते.यामुळे डोक्यावर तान येणे,डोळे दुखने,मेंदुवर परीनाम होने इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कांपुटरमुळे होतांना आपण पहातो.परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे, व्यायाम करणे, जिमनॅस्टिक, किंवा जिमच्या माध्यमातून शरिरयष्टी सुदृढ ठेवने अत्यंत गरजेचे आहे.आपण योगाभ्यासचा विचार केला तर भारतात अनेक युगानु-युगापासुन योगाभ्यास ऋषी-मुनी,साधु-संत, महायोगी, तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची. परंतु आज वाढते प्रदुषण, धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात.परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो.त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासला जास्त महत्व दिले आहे. भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे.त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरिर सुदृढ ठेवण्याची मोठी दीशा देण्याचे काम सुद्धा केले आहे.भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील रहाला आहे.योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दीनाच्या निमित्ताने प्रदुषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी "घर तीथे झाड" ही मोहीम राबवुन या दीवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देवुन वृक्षारोपण केले पाहिजे. कारणआरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे. आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार, कलेक्टर, बीडीओ,असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी. जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे. आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगाकरणे आवश्यक आहे.त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करने अत्यंत गरजेचे आहे.याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने,शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल.अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे.कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे. योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्विकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे.त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे.कारण "आरोग्य हिच संपत्ती"हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे. जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे.त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी "अनमोल रत्न" व "संजिवनी" सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे. योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढवीन्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा "संकल्प" करावयास पाहिजे. कारण पुर्वी ऋषी मुनी, तपस्वी, महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, त्याचप्रमाणे पुर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे यावरून स्पष्ट होते की वृक्षा शिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया;व्यायाम करूया; वृक्ष लावुया; वृक्ष जगवुया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया.जय हिंद!

---------------------------

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर**

# देगलूर तालुक्यात आतापर्यंत ५० टक्के पेरण्या पूर्ण

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------

देगलूर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र ६८,१२२ असून त्यांनी योग्य क्षेत्र ६०९१९ आहे त्यापैकी ३२ हजार ९६३ हे.वर जवळपास ५० टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली असून त्यामध्ये सोयाबीन पिकाखालील पेरणी २१ हजार ४७३ हेक्टर ,तुर पिकाखालील पेरणी ३९०० हे. कापूस पिकाला लागवड ४५७५ हे. मूग पिका खालील पेरणी १०६९ हेक्टर व उडीद पिकाखालील पेरणी १२७१ हेक्टर झालेली आहे
देगलूर तालुक्यात एकूण सात महसूल मंडळ त्यामध्ये देगलूर खानापूर मरखेल माळेगाव शहापूर हाणेगाव नरंगल बुद्रुक अशी सात महसूल मंडळे आहेत आजचीत सरासरी ८७.६ मिलिमीटर पाऊस अपेक्षित होता परंतु सरासरीच्या तुलनेमध्ये देगलूर महसूल मंडळात ७५.८ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे खानापूर महसूल मंडळात ७१.९ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे मरखेल महसूल मंडळात ९३.७ माळेगाव महसूल मंडळात ८६ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे शहापूर महसूल मंडळात ६३.९ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे हाणेगाव महसूल मंडळात ८७.६ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे नरंगल बीके महसूल मंडळात ७१.२ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे सरासरी पेक्षा कमी नरंगल बीके शहापूर खानापूर व देगलूर या चार महसूल मंडळात पाऊस कमी आहे त्यामुळे ८० ते १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये याबाबत कृषी विभागामार्फत देण्यात आलेल्या सूचनेप्रमाणे शेतकऱ्यांनी पुरेपूर ओल असल्याशिवाय पेरणी करू नये असा सल्ला सर्व शेतकऱ्यांना देण्यात येत आहे.

# घोटीमध्ये 'हॉटेल ब्लू इन गेस्ट हाऊस' बंद करण्याचा कट?

## बनावट ना-हरकत प्रमाणपत्रावरून राजकीय गोंधळ डॉ. भूपेश नंदेश्वर यांचा स्फोटक खुलासा?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------



गोरेगाव तालुक्यातील घोटी गावात आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही सत्तेच्या हव्यासाने ग्रासलेल्या राजकीय मंडळींनी बनावट ना-हरकत प्रमाणपत्र तयार करून हॉटेल ब्लू इन गेस्ट हाऊसला लक्ष्य केल्याचे हॉटेल संचालक यांनी खुलासा केला आहे.
"हॉटेलमध्ये देह व्यापार सुरू असल्याचा सरळसरळ खोटा आरोप करून माझ्या प्रतिष्ठेवर हल्ला झाला आहे. ही एक गलिच्छ व कटकारस्थानाने भरलेली बदनामीची मोहीम आहे," असा आरोप हॉटेल मालक डॉ. भूपेश नंदेश्वर यांनी पत्रकार परिषदेत केला.
डॉ. नंदेश्वर यांनी सांगितले की, हॉटेल ब्लू इन गेस्ट हाऊस हे त्यांच्या पत्नी प्रियंका भूपेश नंदेश्वर यांच्या नावे असून, त्यांच्या कडे ग्रामपंचायतचे अधिकृत ना-हरकत प्रमाणपत्र, ओयो हॉटेल परवानगी, फूड डिपार्टमेंट, लेबर कमिशनर आणि उद्योग मंत्रालयाचे वैध कागदपत्रे आहेत. परंतु, ग्रामपंचायत कार्यालयात कोणीतरी खोटे अर्ज दाखल करून, फसवणुकीने बनवलेले प्रमाणपत्र जोडून, हॉटेलवर देह व्यापार चालतो असा अर्ज केला आहे .
पत्रकार परिषदेत डॉ. नंदेश्वर यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना सांगितले की "गावातील काही राजकारणी माझ्या यशाला जळतात. निवडणुकीच्या तोंडावर मला बदनाम करून माझी सामाजिक हत्या करण्याचा प्रयत्न केला जात आहे." "मी डॉक्टर आहे, समाजात प्रतिष्ठेने वावरतो. कोणतीही माहिती न घेता माझ्या नावाने खोट्या बातम्या छापल्या गेल्या. ही गोष्ट मी थेट न्यायालयात नेणार आहे."
पुढे डॉ. नंदेश्वर यांनी स्पष्ट केले की, दिनांक ०७/०४/२०२५ रोजी त्यांना ग्रामपंचायतीतून अधिकृत ना-हरकत प्रमाणपत्र घेतलेले आहे. मात्र त्याच वेळी कोणीतरी हे प्रमाणपत्र चुकीच्या पद्धतीने वापरून त्याचा अर्जात गैरवापर केला.
हे बनावट प्रमाणपत्र आलं तरी कुठून? ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना हाताशी धरून बनावट कागदपत्रे तर तयार केली नाहीत ना?" असा प्रश्न डॉ.नंदेश्वर यांनी उपस्थित केला आहे.
"या सगळ्या राजकारणी टोळीने जर देह व्यापाराचे ठोस पुरावे सादर केले नाहीत, तर मी त्यांच्यावर मानहानी आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल करणार आहे," असा इशारा देत प्रेस काउन्सिल ऑफ इंडिया आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे.
घोटी गावातील हॉटेल ब्लू इन गेस्ट हाऊस हे केवळ एका कुटुंबाचे व्यवसायिक स्थळ नसून, त्यांच्या मेहनतीचं प्रतीक आहे. काही सत्तालोलुप आणि ईर्ष्यावान राजकारणी याचं नाव काळवंडवण्याचा कट करत आहेत. सत्य कधीही लपून राहत नाही – ही लढाई शेवटपर्यंत लढणार! असा निर्धार डॉ. भूपेश नंदेश्वर यांनी व्यक्त केला आहे.

# थाटामाटात वाढदिवस साजरा! पंचायत समिती उपसभापती रामेश्वर महारवाडी यांनी वाढदिवशी लावले 250 झाडं – दिला हरिततेचा संदेश

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------







पंचायत समितीचे उपसभापती आणि भारतीय जनता पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते रामेश्वर महारवाडी यांचा वाढदिवस यंदा ग्रामीण जनतेच्या शुभेच्छांमध्ये आणि हरित संकल्पांसह थाटामाटात साजरा करण्यात आला.
तेढा तुमसर येथील रहिवासी असलेल्या महारवाडी यांच्या कार्याचा लौकिक केवळ गावापुरता मर्यादित नसून, संपूर्ण गोरेगाव तालुक्यात त्यांची राजकीय आणि सामाजिक पकड भक्कम आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे ते ग्रामीण भागातील जनतेचे खरे प्रतिनिधी ठरले आहेत.
२५० झाडांची लागवड – हरित गावाचा संकल्प आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत रामेश्वर महारवाडी यांनी 'वाढदिवस साजरा म्हणजे केवळ केक नव्हे तर कर्तव्य' हे दाखवून दिले. त्यांनी तब्बल २५० झाडांची लागवड करून समाजासमोर हरिततेचा, पर्यावरण संवर्धनाचा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठेवला. हा उपक्रम ग्रामपंचायत आणि पंचायत समिती कार्यालय परिसरात राबवण्यात आला.
राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती वाढदिवसाच्या कार्यक्रमास गोंदिया जिल्हा परिषद बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत, सरपंच योगिता देशमुख, उपसरपंच विजय सहारे, सदस्य तुकाराम मुनेश्वर, ललिता मेंढे, ज्योतीबाई साखरे, देवा सहारे, दीनदयाल फुलबांधे, ग्रामसेवक सूर्यवंशी, कटरे, डहाके, डाकलाल पारधी, नेतराम फुंडे, सतीश डोये, सुखचंद नागरिकर आणि इतर ग्रामपंचायत सदस्य व असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावासाठी काम, जनतेसाठी झपाटलेपणाचं राजकारण महारवाडी हे केवळ राजकीय नेता नसून गावातील प्रत्येक छोट्या-मोठ्या समस्यांवर तत्पर राहून त्या गावातच मार्गी लावण्याचा प्रयत्न करणारे नेता आहेत. गाव सुजलाम सुफलाम व्हावे, नव्या संकल्पनांची अंमलबजावणी व्हावी, यासाठी ते कायमच कार्यरत असतात.
"गाव १० वर्षांपूर्वी कसा होता आणि आज कसा आहे – हे पाहिलं तर रामेश्वर महारवाडी यांच्या योगदानाचं महत्त्व लक्षात येतं, " अशी भावना आज ग्रामस्थांमध्ये प्रकर्षाने दिसून आली.
अशा या सर्वमान्य लोकनेत्याला वाढदिवसानिमित्त ग्रामस्थांनी भरभरून शुभेच्छांचा वर्षाव केला.

# दहावी-बारावी परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------------



येत्या जून-जुलै मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेतील गैरप्रकार, कॉपी रोखण्यासाठी जिल्ह्यातील १८ परीक्षा केंद्र परिसरात जिल्हादंडाधिकारी राहूल कर्डिले यांनी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केला आहे. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून हा आदेश निर्गमीत केला आहे.
या परीक्षा केंद्रापासून शंभर मीटर परिसरात २४ जून ते १४ जुलै २०२५ या कालावधीत (सुट्टीचे दिवस व रविवार वगळून) सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंतच्या वेळेत परीक्षार्थी, परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतीरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही.
परीक्षा कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तिस कॅलक्यूलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इ. तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मीटर पर्यंत परिसरात वापरण्यास, जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास प्रतिबंध केले आहे. या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील १०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध केले आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत नायडोंगरी विद्यालयास तालुक्यात प्रथम पुरस्कार

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------



नांदगाव तालुक्यातील लोकनेते कै अँड विजय शिवराम आहेर हायस्कूल व ज्युनियर ( कला व विज्ञान) कॉलेज नायडोंगरी विद्यालयास मुख्यमंत्री माझी शाळा , सुंदर शाळा स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा पुरस्कार नुकताच जाहीर झाला.

या स्पर्धेच्या मूल्यांकनामध्ये परिसर स्वच्छता, चहू बाजूच्या भिंतींची आकर्षक बोलकी रंग सजावट, परसबाग, वृक्षारोपण, विद्यालयाचे शालेय अभिलेख, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, मुला - मुलींसाठी स्वतंत्र शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा या सह इतर भौतिक सुविधा विद्यालयाच्या गुणवत्तेचे निकष दिसून येतात.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्थेच्या माध्यमातून संस्थाप्रमुख विलासभाऊ आहेर यांनी वायफाय ने सुसज्ज अशी डिजिटल क्लासरूम ची निर्मिती करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीची व्यवस्था प्राप्त करून दिली .या पुढेही तंत्रज्ञानावर भर देऊन विद्यालयास संपूर्ण सुविधा देण्यासाठी संस्था आज ही अग्रकमाने तयार आहे. शासनाच्या विद्यार्थी लाभाच्या विविध शिष्यवृत्ती योजना, विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक महोत्सव, विविध विषयांच्या स्पर्धा परीक्षा आदी सर्व निकष विद्यालयाचे अद्यावत असल्याने नांदगाव तालुक्यातील नायडोंगरी सारख्या ग्रामीण भागातील विद्यालयाने मुख्यमंत्री - माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात प्रथम पारितोषिक मिळविले अशी माहिती प्राचार्या सौ पल्लवी आहेर यांनी दिली.

या अभियानासाठी नांदगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी , शिक्षण विस्तार अधिकारी व नायडोंगरी बीट चे केंद्रप्रमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

मुख्यमंत्री - माझी शाळा , सुंदर शाळा अभियानाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या पल्लवी आहेर ,उपमुख्याधपिका सोनगीरे मॅडम, पर्यवेक्षक मवाळ सर संस्थेचे संचालक तथा मुख्य लिपिक बाळासाहेब भोसले आदिसह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व सेवक वर्गाने विशेष परिश्रम घेतले.

या अभियानात प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल संस्थेचे सरचिटणीस विलासभाऊ आहेर नांदगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रमोद चिंचोले , शिक्षण विस्तार अधिकारी नंदा ठोके ,केंद्रप्रमुख राजेंद्र पाटील व प्राचार्या पल्लवी आहेर यांनी अभिनंदन केले आहे. या यशाबद्दल परिसरातील नागरिकांनीही विद्यालयाचे कौतुक केले.



नांदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्यासाठी विद्यालयाने स्पर्धेत सहभाग घेऊन सर्व घटकांनी परिश्रम घेतले मुख्यमंत्री - माझी शाळा , सुंदर शाळा अभियानात प्रथम क्रमांक मिळविला. शिक्षक पदाधिकारी यांची शाळेप्रती असलेली कर्तव्य भावना, वर्षभरात राबविलेले उपक्रम या मुळे ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या मुलांना प्रेरणा मिळाली भविष्यात जिल्हा पातळीवरील स्पर्धेत भाग घेऊन विद्यालयाच्या प्रगतीत सहभागी होण्याचे आवाहन केले. लवकरच आपले विद्यालय तंत्रज्ञानाने समृद्ध होईल.

**श्री. विलासभाऊ आहेर**
**सरचिटणीस**
**कै शिवराम वेडूजी पाटील शिक्षण प्रसारक मंडळ नायडोंगरी**

# खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून "एकूण खर्च" च्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट!

## पणन संचालकांचं गुप्त वरदहस्त..? श्री हर्षल ठाकरे

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

साक्री तालुक्यातील काही खाजगी बाजार व्यवस्थापकांना कडून सर्रासपणे शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू असून, "एकूण खर्च" या नावाखाली प्रति क्विंटल रु. ९.८५ बातमी इतकी रक्कम बेकायदेशीर रित्या वसूल केली जात आहे. या शुल्काची ना पावती दिली जाते, ना शासकीय संमती आहे, ना विवरण दिले जातं तरीही पणन संचालक या प्रकाराकडे डोळेझाक करत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. यात पणन महासंघाचे व खाजगी कृषी मार्केट मधील व्यापारांचा काही साठलोटतर नाही ना? "सब गोलमाल है" असा शेतकऱ्यांना पडलेला प्रश्न. "एकूण खर्च" म्हणजे नेमकं काय? शेतकरी माल विक्रीसाठी बाजारात येतात, तेव्हा खाजगी बाजार व्यवस्थापन एकूण खर्च या नावाने त्यांच्याकडून पैसे वसूल करतो मात्र या या शुल्क मागचा विवरण नाही कोणताही खर्चाचा तक्ता नाही, ना हमाल मापाडीना मोबदला दिला जातो, ना रक्कम शासनाकडे भरली जाते, म्हणजे ही आर्थिक लूट, आर्थिक गैरप्रकार असूनही प्रशासन गप्प आहे.



न्यायालयाचे आदेश झुगारले मा. औरंगाबाद खंडपीठाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, परवानाधारक हमाल मापाड्यांना कामात सामावून घेणे बंधनकारक आहे. तरीही खाजगी बाजार व्यवस्थापन यांनी या कामगारांना पूर्णतः बहिष्कृत केले आहे, आणि त्यांना कोणताही मोबदला दिला जात नाही ही बाब म्हणजे कामगारांच्या हक्कावर घाला आहे.

**पणन संचालक का गप्प?**

या बेकायदेशीर प्रकाराकडे पणन संचालक यांचं पूर्ण दुर्लक्ष दिसून येत आहे, ते या व्यवस्थापनावर कोणतीही कारवाई करत नाहीत, उलटपक्षी त्यांच्या 'मूक संमतीने' ही लूट सुरू आहे का, असा गंभीर संशय शेतकऱ्यांना उपस्थित होतो.

**हर्षल ठाकरे यांचा थेट सवाल**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) किसान सेलचे जिल्हाध्यक्ष हर्षल ठाकरे यांनी सांगितले की: या बाजार व्यवस्थापनाकडून शेतकरी व हमाल यांच्यावर अन्याय सुरू आहे पणन संचालक यांना सर्व गोष्टी माहीत असूनही ते गप्प का आहेत? ही भूमिका संशयास्पद आहे. शासन परवानगी शिवाय शुल्क घेणे हमालांना ना दूर ठेवणे हे सर्व बेकायदेशीर असून यामागे कोणाचे आशीर्वाद आहेत हे तपासायला हवे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचा इशारा- राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) किसान सेलचे वतीने हर्षल ठाकरे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर हे शेतकऱ्यांचे शोषण थांबले गेले नाही, आणि प्रशासनाने कारवाई केली नाही, तर पक्षाकडून तीव्र आंदोलन उभारण्यात येईल आणि दोषींवर थेट कारवाईची मागणी केली जाईल. तसेच महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना साक्री तालुका यांनीही या गोष्टीला पाठिंबा दिला आहे. खाजगी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शेतकऱ्यांची ही होणारी लूट जर थांबली नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा कांदा उत्पादक संघटने कडूनही दिला आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना साक्री तालुका पदाधिकारी .

# कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे अध्यक्षतेखाली शासकिय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाच्या विनंती नुसार बैठक संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------





शासकिय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ महाराष्ट्र राज्याच्या कृषिभूषन अँड प्रकाश पाटील (अध्यक्ष) यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या विनंतीनुसार माणिकराव कोकाटे कृषीमंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली.बैठकीसाठी प्रधान सचिव कृषी विकासचंद्र रस्तोगी, विस्तार संचालक रफीक नाईकवाडे, उप सचिव ठाकुर,कक्ष अधिकारी व इतर अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते.दुरदृष्यप्रणालीव्दारे कृषी आयुक्त सुरज मांडरे, कृषी प्रक्रिया संचालक विनयकुमार आवटे, निविष्ठा व गुणनियंत्रण संचालक सुनील बोरकर उपस्थित होते. बैठकित कृषिभूषण ॲड प्रकाश पाटील पढावद धुळे यांनी कृषीविषयक विविध समित्यांवर कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना सदस्य म्हणुन घेणेची मागणी केली.त्यानुसार मंत्रीमहोदयांनी याला होकार देऊन कार्यवाही करु असे सांगितले.कृषी विद्यापीठावर सुध्दा पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना प्रतिनिधित्व देऊ असे सांगितले. पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना मानधन,बस मोफत ही सुद्धा मागणी केली.शेतमजुरी रोजगार हमी योजनेअंतर्गत देणे याबाबत मागणी केली असता,हा प्रस्ताव संबंधिताकडे पाठवुन मंजुर करता येईल.शेतमजुरीबाबत शासनाचे धोरण ठरविणे बाबत सकारात्मक आहे.कमी मनुष्य बळात काम करणे, मानव विरहीत यंत्राचा वापर, कापुस वेचणी यंत्राचा वापर व याबाबत खाजगी कंपन्या व शासन यांच्या सहकार्याने भाड्याने उच्च तंत्रज्ञानाची मशीनरी आणुन शेतीचे कामे करणे याबाबत सरकार प्रयत्नशील आहे.कृषी प्रक्रिया उद्योगांना ग्रामपंचायतींची कर आकारणी बंद करणे बाबत ग्राम विकास खात्याकडे प्रस्ताव पाठविला जाणार आहे.जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी सेंद्रिय कर्ब वाढविणे साठी प्रयत्न केला जाईल.

यासोबतच कृषिभूषन अँड प्रकाश पाटील यांनी पिक विमा योजनेत सुधारणा सुचविल्या.यात तालुका, जिल्हा,राज्यस्तरीय समित्यांवर पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना प्रतिनिधित्व देऊन समित्या सक्रिय करणे, शेतकऱ्यांना विमा कंपनी योग्य असल्यावरही नुकसान देत नसेल तर टेंडर देतांना विमा कंपनी कडुन डिपा◌ॅझिट घेऊन, त्यातुन नुकसान भरपाई देणे,पिक विमा मंजुर शेतकऱ्यांना मंजुरीचा एस एम एस करणे, बँका नुकसान भरपाई देत नसतील तर त्यांच्या कमिशनच्या चार टक्क्यातुन वजावट करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे या सुचनांच्याही कार्यवाहीचे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले.पिक विमा योजनेत पिक कापणी प्रयोगानुसार नुकसान भरपाई दिली जाते.मात्र ही पिक कापणी मानवीय असल्याने यात चुका होऊन पात्र शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई मिळत नाही.त्याकरीता केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचना नुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पिकाची उत्पादकता ठरवुन नुकसान भरपाई दिली तर अचुकता येईल.ह्याच पिक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीनुसार नुसार उत्पादकता ठरविली जाते.त्यामुळे किमान आधारभूत किंमत खरेदीत शेतकऱ्यांकडुन पुर्ण शेतमाल घेतला जात नाही.कमी उत्पादकता येत असल्याने देशाचे अपेक्षित उत्पादन कमी दिसते, म्हणुन केंद्र सरकार आयातीचा निर्णय घेते.यामुळे शेतकऱ्यांना नुकसान होऊन,सरकारचे परकिय चलन सुध्दा जाते.त्यामुळे पिकांची उत्पादकता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून काढली तर अचुकता येऊन शेतकऱ्यांना फायदा होईल.

*प्रकाश पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे अगोदर मानांकनाच्या यादीत पुढे होती.आता मात्र आपल्या राज्यातील विद्यापिठांचा दर्जा घसरला आहे.याला इतर कारणासोबत मनुष्यबळाची कमतरता, निधीची कमतरता हेही एक कारण आहे.याकरीता शासनाने प्रयत्न करावयास पाहिजे.यामुळे विद्यापीठाच्या संशोधन, शिक्षण व विस्तार कामावर प्रभाव पडुन शेतकऱ्यांना नुकसान होत आहे.कृषी विद्यापीठांनी आतापर्यंत चांगले नोकरदार, चांगले उद्योजक तयार केलेत, पण चांगले शेतकरी तयार केले नाहीत.कृषी विद्यापीठात व कृषी शिक्षण व संशोधन परिषदेवर पण पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना प्रतिनिधित्व देण्याची मागणी केली.ती मंत्रीमहोदयांनी मान्य केली.व यापुढे या समित्यांवर कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांची निवड केली जाईल, असे आश्वासन दिले.*

प्रकाश पाटील यांनी सुचविले की,राज्यात जेही शेतीविषयक सभा, मेळावे कार्यक्रम होतील, त्याचे अध्यक्षस्थान उपस्थित पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना दिले जावयास पाहिजे.याबाबत मंत्रीमहोदयांनी आयुक्तांना तसे आदेश काढण्याचा आदेश दिला.

चर्चेत कृषिभूषन सदाशिव थोरात परभणी, कृषिभूषन नाथराव कराड, कृषी रत्न विश्वंभर बाबर सातारा, उद्यान पंडीत भिमराव गाजरे पुणे,जगदीश चव्हाण यवतमाळ, यज्ञेश सावे पालघर, राजेंद्र गायकवाड सातारा,बबन हरणे ठाणे यांनी भाग घेतला.बैठकीला पांडुरंग डोंगरे जालना, अट्रास्वामी कोडपे नागपुर, रविंद्र गायकवाड वाशिम, प्रविण पाटील जळगाव,शरद पवार धुळे, राहुल पाटील जळगाव उपस्थित होते.

यापुढेही शेतकऱ्यांच्या शेतीविषयक सुचना असतील तर त्या सुचवाव्यात, त्याबाबतही कार्यवाही केली जाईल असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले.

# पिंपरी-चिंचवडकरांचा भक्तिभावाने निरोप

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा उद्योगनगरीचा पाहुणचार घेऊन शुक्रवारी पुण्याकडे मार्गस्थ झाला. पिंपरी-चिंचवडकरांनी भक्तिभावाने निरोप दिला. पहाटेपासूनच नागरिक जुन्या मुंबई-पुणे महामार्गासह चऱ्होली, वडमुखवाडी, चोवीसावाडीत दुतर्फा थांबलेले होते. पालखीचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळा गुरुवारी सायंकाळी उद्योगनगरीत दाखल झाला होता. आकुर्डीतील विठ्ठल रखुमाई मंदिरात दुसरा मुक्काम झाला. रात्री पालखी तळावर कीर्तन झाले. त्यानंतर जागर झाला. शुक्रवारी पहाटे संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांच्या उपस्थितीत मंदिरात महापूजा झाली. काकड आरती झाली. त्यानंतर सोहळा मार्गस्थ झाला. खंडोबा माळ चौकातून सोहळा मुंबई-पुणे महामार्गाने पुण्याकडे निघाला. पालखीने पिंपरीतील एच.ए. कॉलनीतील विठ्ठल मंदिरात पहिला विसावा घेतला. दिंड्याही थांबल्या. तिथे न्याहरी केल्यानंतर पालखी सोहळा पुढे निघाला. पालखी सोहळ्याने दुसरा विसावा कासारवाडीत घेतला. तर, दुपारची विश्रांती दापोडीत घेतली. त्यानंतर पालखी सोहळ्याने हॅरीस पुलावरून पुण्यातील बोपोडीत प्रवेश केला.

ज्ञानोबा-तुकाराम असा जयघोष करत आणि टाळ-मृदंगाच्या गजरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे पिंपरी-चिंचवड शहरात शुक्रवारी सकाळी आगमन झाले. महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. दिघी मॅगझीन चौकात झालेल्या या स्वागत सोहळ्याला अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपायुक्त सचिन पवार, राजेश आगळे, अण्णा बोदडे उपस्थित होते. यावेळी मानाच्या दिंड्यांना कापडी पिशवी, देशी वृक्षांच्या बिया, तुळशीचे रोप, संपर्क माहिती पुस्तिका आणि प्रथमोपचार पेटी देऊन सन्मान करण्यात आला. आयुक्त सिंह यांच्यासह महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी टाळ मृदंगाच्या तालावर ठेका धरत पालखीत सहभागी झाले. उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाच्या वतीने पालखी स्वागताच्या ठिकाणी आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती. आषाढीवारी निमित्त वृक्षारोपण, हरीतवारी असे विविध उपक्रम देखील महापालिकेच्या वतीने राबविण्यात आले. स्वागताच्या ठिकाणी महापालिकेच्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अभंग गायनाचा कार्यक्रम सादर केला. चऱ्होली, वडमुखवाडी, चोवीसावाडीतील भाविक थोरल्या पादुकापर्यंत पालखीला निरोप देण्यासाठी आले होते. सकाळची विश्रांती घेतल्यानंतर पालखीने पुण्याकडे मार्गक्रमण केले. दुपारी बाराच्या सुमारास पालखी सोहळा पुणे शहराच्या हद्दीकडे मार्गस्थ झाला. भक्तिमय वातावरणात पिंपरी-चिंचवडमधील भाविकांनी पालखीला निरोप दिला.